महापारेषण

# महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

## वित्त व लेखा विभाग

प्रकाशगंगा, प्लॉट क्र.सी-१९, 'ई' ब्लॉक,
वांद्रा-कुर्ला संकूल, वांद्रा (पूर्व) मुंबई - ४०० ०५१
वेब साईट : http://www.mahatransco.in

दूरध्वनी क्र.०२२-२६५९५०००/८५९५

फॅक्स क्र.०२२-२६५९०७६८

**महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित (महापारेषण) वित्तीय वर्ष २०१३-१४ ते वित्तीय वर्ष २०१५-१६ हया नियंत्रण कालावधीकरीता बहुवार्षिक दराबाबत विनंती अर्ज**

(१) **कार्यकारी सारांश :—**

१.१ **पार्श्वभूमी :—**

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित (**संक्षिप्त नाव महापारेषण – MSETCL MAHATRANSCO**) ही संस्था राज्याच्या वीज पारेषणाचे उपयुक्त कार्य करत आहे. विजेची निर्मिती जेथे होते ती केंद्रे आणि अन्य स्त्रोत येथून विजेचे तिच्या भार केंद्रापर्यंत वाहून नेण्याचे म्हणजेच पारेषण करण्याच्या उद्दिष्टासाठी एका राज्यव्यापी पारेषण प्रणालीची स्थापना, नियोजन व विकास करणे व तिचे प्रवर्तन/ संचालन व देखभाल करणे हे कार्य करणारी महापारेषण ही एकमेव राज्यव्यापी संस्था आहे. महापारेषण कंपनी सादर करीत असलेल्या विनंती अर्जाचे हेतू पूढीलप्रमाणे आहेत :-

- वित्तीय वर्ष २०११-१२ च्या वार्षिक महसूलाची आवश्यकता सत्यानुरूप करणे (Truing up a ARR).
- वित्तीय वर्ष २०१२-१३ मधील वार्षिक कामगिरीचा आढावा
- वित्तीय वर्ष २०१३-१४ ते वित्तीय वर्ष २०१५-१६ या नियंत्रणाच्या द्वितीय कालावधीसाठी वार्षिक महसूलाच्या आवश्यकतेचे प्रक्षेप करणे.
- त्यासोबत गतकालीन वित्तीय वर्ष २००७-०८, वित्तीय वर्ष २००८-०९ आणि वित्तीय वर्ष २०१०-११ या कालावधीचे भांडवलीकरण अमान्य केल्यामुळे झालेले परिणाम दर्शविणे इ.

या विनंती अर्जात एकूण परिस्थितीचे चित्र खालील विभागात दर्शविले आहे.

१.२ **मागील काही वर्षात मत्तांचे भांडवलीकरण अमान्य केल्याने झालेले परिणाम** :-

सन्माननीय महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, यांनी वित्तीय वर्ष २००७-०८, वित्तीय वर्ष २००८-०९ आणि वित्तीय वर्ष २०१०-११ या वित्तीय वर्षामध्ये काही मत्तांच्या रकमांचे भांडवलीकरण्याची विनंती अमान्य केली होती. म्हणून महापारेषण कंपनी या अर्जात सादर करते की, अमान्य केलेल्या भांडवलीकरणाचा काही भाग या विनंती अर्जात समाविष्ट करण्यात आलेला आहे. तसेच या अर्जातील डीपीआर योजनेचे खर्च-लाभ विश्लेषण हे सुध्दा मा. आयोग यांचेकडे वेगळे सादर केलेले आहे.

उपरिनिर्दिष्ट वर्षातील भांडवलीकरण अमान्य केल्यामुळे घसारा, दिर्घ मुदतीच्या कर्जाचे व्याज, खेळत्या भांडवलावरील व्याज व अशा मत्तांच्या संबंधीचा परतावा या बाबींवर झालेल्या परिणामांचा हिशेब केला आहे. महापारेषण कंपनीने अशा मत्ता वापरात आणण्यास प्रारंभ झालेल्या वर्षापासून म्हणजेच भांडवलीकरणाच्या तारखेपासून त्यांच्या घसारा व भांडवली खर्च यांचा दावा केला आहे. याशिवाय, त्यांचे वार्षिक महसूलाच्या गरजेचे इतर लेखाशिर्ष (Heads of ARR) म्हणजेच खेळत्या भांडवलावरील व्याज, लाभ व हानी यांचे वाटप व पारेषणाच्या उपलब्धतेत प्रोत्साहन यांच्यावर परिणाम होणार आहे.

महापारेषणने संबंधित वर्षात भांडवलीकरण अमान्य केलेल्या खालील रकमांचा दावा केला आहे.

***तक्ता क्र. १ :— <u>अमान्य केलेल्या भांडवलीकरणाचा दावा</u> :-***

(रू. कोटीत)

| वित्तीय वर्ष | अमान्य भांडवलीकरणाचा दावा |
|---|---|
| २०१०-११ | ५६.४८ |
| २००८-०९ | ७३.३५ |
| २००७-०८ | २६३.३० |

अमान्य भांडवलीकरणाच्या एकूण परिणामांचा सारांश खालील तक्त्यात दिला आहे

***तक्ता क्र. २ :— <u>अमान्य भांडवलीकरणाच्या दाव्याचा सारांश</u> :-***

(रू. कोटीत)

| तपशील | वित्तीय वर्ष २००७-०८ | वित्तीय वर्ष २००८-०९ | वित्तीय वर्ष २००९-१० | वित्तीय वर्ष २०१०-११ | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| ROE | ३.६९ | ११.४० | १२.४३ | १३.२२ | ४०.७३ |
| घसारा AAD समाविष्ट | — | — | — | — | — |
| दिर्घ मुदतीच्या कर्जाचे व्याज | ११.०८ | २८.७६ | २८.७५ | २८.३३ | ९६.९१ |
| खेळाच्या भांडवलाच्या कर्जाचे व्याज (कार्यक्षमता लाभ) | ०.२९ | ०.९० | ०.५४ | ०.५१ | २.२४ |
| आकस्मिक राखीवसाठी अंशदान | — | १.३४ | ०.८४ | ०.८५ | ३.०२ |
| उच्चस्तर उपलब्धतेसाठी प्रोत्साहन | ०.१३ | ०.७८ | ०.५५ | ०.७९ | २.२५ |
| एकूण | **१५.१९** | **४३.१७** | **४३.११** | **४३.६९** | **१४५.१६** |

या एकूण १४५.१६ कोटीच्या महसूल त्रूटींचा समावेश वित्तीय वर्ष २०१३-१४ च्या एकूण महसूलाच्या गरजेत (ARR) करावा असा महापारेषणचा प्रस्ताव आहे. म्हणून मा. आयोगाला कळकळीची विनंती करण्यात येते की, वित्तीय वर्ष २०१३-१४च्या वार्षिक महसूल गरजेच्या (ARR) प्रस्तावात या त्रुटींचा समावेश करून ती भरून काढावी. तसेच मा. आयोगास विनंती करण्यात येते की, त्यांनी या अमान्य भांडवलीकरणाच्या परिणामामुळे होणा-या चालू खर्चाचा विचार करावा व त्याची वसूली करण्याची परवानगी द्यावी. कारण महापारेषण या कारणाकरीता आवश्यक असणारा महसूल मिळण्यास असमर्थ आहे.

### १.३ वित्तीय वर्ष २०११-१२ ची वार्षिक महसूल गरज सत्यानुरूप करणे :—

महापारेषण कंपनीने वित्तीय वर्ष २०१०-११ चे सत्यानुरूप करणे व वित्तीय वर्ष २०११-१२ व वित्तीय वर्ष २०१२-१३ च्या एकूण महसूल गरजेचे मंजुरी मिळवण्यासाठी मा. आयोगास विनंती अर्ज सादर केला होता. त्यासाठीचे प्रकरण क्र.१६९ वर्ष २०११ चे याबाबत दिनांक १८ मे,२०१२ रोजी आदेश दिला होता. याशिवाय महापारेषण कंपनीने केलेला आढावा घेण्याच्या विनंती अर्जावर प्रकरण क्र.१०६ वर्ष २०१२ यावर आदेश दिला होता. त्यात वित्तीय वर्ष २०११-१२ ची एकूण महसूल गरज पून्हा नमूद केली होती. आता वित्तीय वर्ष २०११-१२ चे लेखापरीक्षीत केलेले वार्षिक लेखे तयार असल्यामुळे, ते सत्यानुरूप करण्याची विनंती अर्ज दाखल करण्यात येत आहे.

#### १.३.१ : एकूण महसूल गरज (ARR) :—

#### १.३.१.१ : संचालन व सुव्यवस्था खर्च :—

महापारेषण कंपनी सादर करते की, मा आयोगाने आपल्या प्रकरण क्र.१३७ वर्ष २०११ यानुसार महापारेषण कंपनीच्या व्यावसायिक आराखडा (Business Plan) यावर दिलेल्या आदेशात मान्य केलेल्या संचालन व सुव्यवस्थेच्या खर्चाच्या तुलनेत प्रत्यक्ष खर्च किंचित कमी झाले आहेत. मात्र अन्य उपलेखा शीर्षाच्या खर्चात वरीच वाढ झाली आहे. प्रशासन व सर्वसामान्य खर्च (A & G Expenses) यामध्ये वाढ झाली, कारण सुरक्षा खर्च, प्रशिक्षण खर्च वाढले याशिवाय विजेचे आकार तसेच वाहने चालविणे, भाडी हे खर्चसुध्दा वाढले. अधिकृत भागभांडवल वाढल्यामुळे अर्ज दाखल करण्याचे शुल्कही जादा भरावे लागले. याशिवाय कर्मचारी खर्चातही वाढ झाली कारण महागाई भत्ता, मूळ वेतन वाढले आणि रजा रोखीकरणात कपात झाली. मा.आयोगाने मंजुरी दिलेले नुतनीकरण व आधुनिकीकरण (R & M) यांचे खर्च काहीसे कमी प्रमाणात झाले.

#### १.३.१.२ भांडवली खर्च आणि भांडवलीकरण :—

महापारेषण कंपनी असे नमूद करू इच्छिते की, प्रकरण क्र.१३७ वर्ष २०११ यानुसार वित्तीय वर्ष २०११-१२ ते वित्तीय वर्ष २०१५-१६ या द्वितीय नियंत्रण कालावधीसाठीच्या बहुवार्षिक दर व्यवसाय आराखडा (MYT - Business Plan) यामध्ये महापारेषण कंपनीने रू.२१९५.९६ कोटीचे भांडवलीकरण सादर केले होते. आता या विनंती अर्जात रू.२२६१.३२ कोटी भांडवलीकरणाचा दावा सादर केला असून तो या वर्षाच्या प्रत्यक्ष आकडेवारीनुसार केला आहे.

#### १.३.१.३ घसारा :—

यात घसा-याची अग्रीमे (AAD) समाविष्ट आहेत. महापारेषण कंपनीने घसा-याच्या अग्रीमासह घसा-याचा हिशेव केला आहे. तो आरंभीचे मत्ता(GFA) आणि या वर्षात मत्तांची झालेली भर यांच्या प्रत्यक्ष रकमेवर आधारलेला आहे. मा.आयोगाने प्रकरण क्र.१३७ वर्ष २०११ यांच्या आदेशानुसार वित्तीय वर्ष २०११-१२ आणि वित्तीय वर्ष २०१२-१३ याकरीता घसा-यांच्या अग्रीम मंजूर केला होता. महापारेषण कंपनी या अर्जानुसार विनंती करते की, मा.आयोगाने वित्तीय वर्ष २०११-१२ साठी प्रत्यक्ष हिशेवाच्या आधारे केलेला घसारा व त्यात समाविष्ट केलेला घसा-याचा अग्रीम यास मंजूरी द्यावी.

१.३.१.४ **दिर्घ मुदतीच्या कर्जाचे व्याज :—**

महापारेषण कंपनी सादर करते की, वित्तीय वर्ष २०११-१२ मध्ये केलेला भांडवली खर्च हा महत्वाच्या वित्तीय संस्थांकडून (FIS) घेतलेल्या दिर्घ मुदतीच्या भांडवली खर्चातून भागविण्यात आला. या संस्था म्हणजे पीएफसी, जेआयसीए, आरईसी, बँक ऑफ बरोडा, युनियन बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ महाराष्ट्र आणि ओरिएंटल बँक ऑफ कॉमर्स आहे.

१.३.१.५ : **खेळत्या भांडवलावरील व्याज :—**

महापारेषण कंपनीच्या खेळत्या भांडवलाच्या व्याजावरील कार्यक्षमतेचे लाभ याचा लाभ व हानीच्या वाटपानंतर निव्वळ हक्काची रक्कम रू.५१.५४ कोटी इतकी आहे.

१.३.१.६ : **इतर खर्च**

महापारेषण कंपनीने सदर वर्षाचे इतर खर्चाचा दावा प्रत्यक्ष खर्चानुसार केला आहे. त्याची रक्कम रू.१०९.५२ कोटी आहे.

१.३.१.७ : **समभागावर परतावा**

महाराष्ट्र वीज नियामक आयोग दर नियमावली २००५ मधील नियमन क्र.५०.१ नुसार महापारेषण कंपनीची समभागावरील परताव्याची रक्कम रू.५५९.२१ कोटी आहे.

१.३.१.८ : **आय कर**

महापारेषण कंपनीने मा.आयोगास विनंती केली आहे की, त्यांनी वित्तीय वर्ष २०११-१२ च्या प्रत्यक्षावर काढलेली आयकरासाठी रू.१७९.६७ कोटी एवढी रक्कम मंजूर करावी.

१.३.१.९. : **आकस्मिक राखीव साठी अंशदान**

महापारेषण कंपनीची मा. आयोगास नम्रपणे विनंती आहे की, त्यांनी वित्तीय वर्ष २०११-१२ च्या लेखापरिक्षीत लेख्यांच्या आधारे आकस्मिक राखीवसाठी अंशदानाची सत्यानुरूप रक्कम रू.३३.३९ कोटी मंजूर करावी.

१.३.१.१० : **पारेषण आकाराचा महसूल**

महापारेषण कंपनी सादर करते की, कंपनीचा वित्तीय वर्ष २०११-१२ साठी महापारेषण दरापासूनचा प्रत्यक्ष महसूल रू.२२६४.२५ कोटी इतका आहे. या व्यतिरिक्त ,महापारेषण कंपनीला गोवा व दादरा-नगर (हवेली) यांच्याकडे केंद्रिय स्त्रोतांतील वीज पारेषणचे 'व्हिलींग चार्जेस' अनुक्रमे रू.२०.५८ कोटी आणि रू.५.७२ कोटी असा महसूल मिळविला आहे.

१.३.१.११ : **दराव्यतिरिक्त उत्पन्न**

महापारेषण कंपनीने वित्तीय वर्ष २०११-१२ दरम्यान दराव्यतिरिक्त उत्पन्नापोटी रू.१७७.६६ कोटीचा दावा यापूर्वी केला होता व मा.आयोगाने त्यास यापूर्वीच्या आदेशात मंजुरी दिली होती. परंतु महापारेषण कंपनीचे वित्तीय वर्ष २०११-१२ दरम्यान दराव्यतिरिक्त उत्पन्न रू.३०८.८४ कोटी आहे. दराव्यतिरिक्त उत्पन्नात 'आकस्मिक राखीव दर' व अन्य गुंतवणुकीवरील व्याज, खुल्या प्रवेशाचे आकार, पुनर्लिखित केलेली जादा तरतूद आणि भंगाराच्या विक्रीचा महसूल व नफा यांचा समावेश आहे.

याशिवाय महापारेषण कंपनीच्या निदर्शनास आले की, यापूर्वीच्या वर्षात दुरूस्ती व देखभाल यासाठी आकारलेला रू.१५२.४८ कोटी रकमेचे काही वस्तूमाल व सुटे भाग हा प्रत्यक्षात वापरले गेले नव्हते व त्यानुसार महापारेषण कंपनीने त्याच्या लेखा नोंदला आणि वस्तूमालाचे मूल्य भविष्यात दुरूस्ती व देखभालीच्या खर्चासाठी वापरले जाईल. म्हणून भविष्यात दुरूस्ती व देखभाल (R&M) खर्च कमी राहील. म्हणून महापारेषण कंपनीने या महसूलाची वित्तीय वर्ष २०१३-१४ या पुढील पाच वर्षासाठी व्याप्ती केली आहे (म्हणजेच नियंत्रण कालावधीसाठी) आणि त्यानुसार दुरूस्ती व देखभाल खर्च प्रत्येक वर्षी कमी केले आहेत.

### १.३.१.१२ : पारेषणाच्या उपलब्धतेसाठी प्रोत्साहन रक्कम

महापारेषण कंपनी सादर करते की, मा.आयोगाने विनिर्देशित केलेल्या प्रमाणकांपेक्षा एच व्ही ए सी नेटवर्कची उपलब्धता खूपच जास्त होती. मा.आयोगाला महापारेषण कंपनीची कळकळीची विनंती आहे की, त्यांनी वित्तीय वर्ष २०११-१२ मध्ये एच व्ही ए सी आणि एच व्ही डी सी प्रणाली साठीची प्रोत्साहके अनुक्रमे रू.४५.६५ कोटी आणि ७.४६ कोटी मंजुरी करावीत.

### १.३.१.१३ : वित्तीय वर्ष २०११-१२ साठी सत्यानुरूप सारांश

तक्ता क्र.३ : वित्तीय वर्ष २०११-१२ साठी सत्यानुरूप सारांश

| तपशील | मविनि आयोगाने प्रकरण क्र.१०६ वर्ष २०१२ यात मंजूर केलेला | लेखा परिक्षीत | सत्यानुरूप रक्कम | कार्यक्षमता प्राप्ती/ हानी टी एस यू सोबत वाटप | महापारेषण कंपनीची नक्त हक्काची तक्त रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| संचालन व सुव्यवस्था खर्च | १०४०.६६ | ९६७.२० | (७३.४६) | | ९६७.२० |
| कर्मचारी खर्च | ६०५.७९ | ५८१.६१ | (२४.१८) | | ५८१.६१ |
| प्रशासकीय व सामान्य खर्च | १०८.९२ | १८१.३७ | ७२.४५ | | १८१.३७ |
| दुरूस्ती व देखभाल खर्च | ३२५.९५ | २०४.२१ | (१२१.७४) | | २०४.२१ |
| घसारा | ४०७.९७ | ४२१.७९ | १३.८२ | | ४२१.७९ |
| घसा-यापोटी अग्रीम | २२४.०४ | ३२३.३६ | ९९.३२ | | ३२३.३६ |
| दीर्घ मुदतीचे भांडवली कर्जाचे व्याज | ४१७.९५ | ३८४.४७ | (३३.४८) | | ३८४.४७ |
| खेळते भांडवल व ग्राहक सुरक्षा अनामतीचे व्याज | ६६.५८ | ६६.१० | (०.४८) | १५.०४ | ५१.०६ |
| व्याज व वित्तीय आकार | १८.४२ | १३.६१ | (४.८१) | | १३.६१ |
| इतर खर्च | ८७.८७ | १०९.५२ | २१.६५ | | १०९.५२ |
| आयकर | १३३.९८ | १७९.६७ | ४५.६९ | | १७९.६७ |
| आकस्मिक राखीवसाठी अंशदान | ३२.५७ | ३३.३९ | ०.८२ | | ३३.३९ |
| **एकूण महसूली खर्च** | **२४३०.०५** | **२४९९.०९** | **६९.०४** | | **२४८४.०६** |
| समभाग भांडवलावरील परतावा | ५३५.६८ | ५५९.२१ | २३.५३ | | ५५९.२१ |

| तपशील | मविनि आयोगाने प्रकरण १०६ वर्ष २०१२ चे यात मंजूर केलेला | लेखा परिक्षीत | सत्यानुरूप रक्कम | कार्य क्षमता/ प्राप्ती/ हानी टी एस यू सोबत वाटप | महापारेषण कंपनीची नक्त हक्काची नक्त रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| **एकूण महसूल गरज** | २९६५.७३ | ३०५८.३० | ९२.५७ | | ३०४३.२६ |
| वजा ःदराव्यतिरीक्त उत्पन्न | १७४.६६ | ३०८.८४ | १३४.१८ | | ३०८.८४ |
| <u>वजा</u>ः गोवा, दादरा-नगर हवेली व्हिलींग चार्जेस | २०.५२ | २६.३० | ५.७८ | | २६.३० |
| <u>वजा</u>ः मालाच्या पूनर्मूल्यांकनामुळे कर्जफेडीच्या तरतुदीचे उत्पन्न | ०.०० | ०.०० | ०.०० | | ०.०० |
| **पारेषण दरापासून एकूण महसूलाची गरज** | २७७०.५५ | २७२३.१५ | (४७.४०) | | २७०८.१२ |
| **विद्यमान पारेषण दरापासून महसूल** | २२६४.२८ | २२६४.२५ | (०.०३) | | २२६४.२५ |
| चालू वर्षातील महसूल (फरक)/आधिक्य | (५०६.२७) | (४५८.९०) | ४७.३७ | | (४४३.८७) |
| मागील वर्षापर्यंतचा महसूल (फरक)/आधिक्य | (७५२.९०) | (७५२.९०) | ०.०० | | (७५२.९०) |
| सदर वर्षापर्यंत संचित महसूल फरक | (१२५९.१७) | (१२११.८०) | ४७.३७ | | (११९६.७७) |
| <u>अधिक</u>ः एचव्हीएसी प्रणालीच्या पारेषण उपलब्धतेचे प्रोत्साहक | | | | | ४५.६५ |
| <u>अधिक</u>ः एचव्हीडीसी प्रणालीच्या पारेषण उपलब्धतेचे प्रोत्साहक | | | | | ७.४६ |
| वर्षाचे संचीत महसूल (फरक)/आधिक्य | | | | | (१२४९.८८) |

मा. आयोगास विनंती करण्यात येते की, त्यांनी वित्तीय वर्ष २०११-१२ च्या नक्त सत्यानुरूप गरजेची रक्कम रू.१२४९.८८ कोटीस मंजुरी द्यावी व मा. आयोगास विनंती करण्यात येते की, त्यांनी वित्तीय वर्ष २०१३-१४ च्या एकूण महसूल गरजेतील महसूलाच्या फरकाचा समावेश करण्यास मंजुरी द्यावी.

## १.४ <u>वित्तीय वर्ष २०१२-१३ मधील वार्षिक कामगिरीचा आढावा ः—</u>

### १.४.१ <u>एकूण महसूलाची गरज ः—</u>

#### १.४.१.१ <u>संचालन व सुव्यवस्था (देखभाल) खर्च ः—</u>

या विनंती अर्जाच्या हेतुसाठी महापारेषण कंपनीने मा. आयोगाने प्रकरण क्र.१३७ वर्ष २०११, महापारेषण कंपनीचा व्यवसाय आराखडा यात मंजूर केलेली संचालन व सुव्यवस्थेच्या खर्चापोटीची रू.१११५.४२ कोटी ही रक्कम विचारात घेतली आहे.

१.४.१.२. **भांडवलीकरण** ः—

या विनंती अर्जाच्या हेतुसाठी महापारेषण कंपनीने मा.आयोगाने प्रकरण क्र.१६९ वर्ष २०११ मध्ये मंजूर केलेले रू.३८७४.६२ कोटीचे भांडवलीकरण विचारात घेतले आहे.

१.४.१.३ **व्याज व वित्तीय आकार** ः—

महापारेषण कंपनीने दिर्घ मुदतीच्या कर्जाच्या व्याज खर्चाची रक्कम रू.५०४.०३ कोटी इतकी असेल असा अंदाज केला आहे. हा अंदाज वित्तीय वर्ष २०११-१२ पासून पुढे नेण्यात आलेले प्रत्यक्ष कर्ज आणि वित्तीय वर्ष २०१२-१३ साठी काढावयाचे अंदाजे कर्ज यावर आधारीत आहे. व्याजाच्या खर्चाच्या भांडवलीकरणासाठी महापारेषण कंपनीने प्रगतीपथावरील कामे बंद होण्याचा दर ११.५ टक्के असा विचारात घेतला आहे. याशिवाय महापारेषण कंपनीने इतर व्याज व वित्तीय आकार हे मा. आयोग यांनी महापारेषण कंपनीच्या व्यवसाय आराखडा या प्रकरण क्र.१३७ वर्ष २०११ मध्ये मंजूर केल्यानुसार गृहित धरले आहे.

१.४.१.४. **घसारा** ः—

महापारेषण कंपनीने वित्तीय वर्ष २०१२-१३ साठी घसा-याचा हिशेव करताना मा. आयोग (दराच्या अटी व शर्ती) नियम २००१ यातील घसा-याचा दर विचारात घेतला आहे. महापारेषण कंपनीने वित्तीय वर्ष २०१२-१३ साठी घसाराकरीता अग्रीम एएडी समाविष्ट करून रू.९७८.८२ कोटी अशा रकमेचा हिशेव केला आहे. तो प्रत्यक्ष आरंभीचा जीफए यावर आधारीत आहे आणि मा. आयोगाने महापारेषण कंपनीचा व्यवसाय आराखडा प्रकरण क्र.१३७, वर्ष २०११ यावावत दिलेल्या आदेशात त्या वर्षाची मंजुरीत मत्ता मधील भर यानुसार आहे.

१.४.१.५ ः **खेळते भांडवल व ग्राहक सुरक्षा अनामत यावरील व्याज**

मा.वीज नियामक आयोग दर नियमावली २००५ यात विहीत केलेल्या प्रमाणशीर मापदंड यांच्या आधारे महापारेषण कंपनीने आवश्यक खेळते भांडवलाचे व्याज रू.८०.३३ कोटी असे हिशेवात धरले आहे. तसेच मा. आयोगाने वित्तीय वर्ष २०१२-१३ च्या खेळते भांडवलाच्या व्याजाचा हिशेव करण्यासाठी विचारात घेतल्याप्रमाणे महापारेषण कंपनीनेही SBI-PLR १४.७५ टक्के हा अल्प मुदतीचा दर विचारात घेतला आहे.

१.४.१.६ ः **समभागावरील परतावा**

महापारेषण कंपनीने मा.वीज नियामक आयोग दर नियमन २००५ या आधारे वित्तीय वर्ष २०१२-१३ साठी समभागावरील परताव्याची रक्कम रू.६४१.३१ कोटी असेल असा अंदाज केला आहे. याशिवाय महापारेषण कंपनीने नियंत्रण कालावधीकरीता मत्तांच्या निवृत्तीवर समभाग परतावावरील घटाचा अंदाज प्रकरण क्र १०६ वर्ष २०१२ आणि व्यवसाय आराखडयाच्या प्रकरण क्र.१३७ वर्ष २०११ या आदेशात ठरवून दिलेल्या पध्दतीनुसार केला आहे.

१.४.१.७ ः **इतर वर्ष**

महापारेषण कंपनीने इतर खर्चाचा अंदाज हा वित्तीय वर्ष २०११-१२ मध्ये झालेल्या प्रत्यक्ष खर्चावर नाममात्र २ टक्के वाढ होईल अशा पध्दतीने केलेला आहे. पूर्व काळातील समायोजन आणि विनिमय दरातील वदलामुळे होऊ शकणारी हानी या वावी अंदाज करतांना विचारात घेतलेल्या नाहीत.

१.४.१.८ : **आकस्मिक राखीवसाठी अंशदान**

मा.वीज नियामक आयोगाने महापारेषण कंपनीचा व्यवसाय आराखडयासाठी प्रकरण क्र.१३७ वर्ष २०११ या आदेशात मंजुरी देतांना अंगीकारलेल्या पध्दतीनुसार महापारेषण कंपनीने आरंभीच्या GFA च्या ०.२५ टक्के याप्रमाणे आकस्मिक राखीवसाठी अंशदानाचे रू.४०.२० कोटी हिशेवात धरले आहेत.

१.४.१.९ **आयकर** :—

मा.महाराष्ट्र वीज नियामक आयोग दर नियम २००५ यानुसार, महापारेषण कंपनीने वित्तीय वर्ष २०१२-१३ साठी एकूण महासूलाच्या गरजेचा भाग म्हणून आयकरासाठी रू.२७५.४८ कोटीचा दावा केला आहे. वित्तीय वर्ष २०१२-१३ साठी आयकर दायित्वाचा अंदाज हा आयकर अधिनियमातील डब्ल्यूडीव्ही (WDV) घसारा विचारात घेऊन केला आहे,.

१.४.१.१० **दराव्यतिरिक्त उत्पन्न (NTI)**

महापारेषण कंपनीने दराव्यतिरिक्त उत्पन्नातील व्याजाचे उत्पन्न वगळून इतर घटकांचा अंदाज करताना वित्तीय वर्ष २०११-१२ च्या प्रत्यक्ष मूल्यात २ टक्के वाढ गृहीत धरली आहे. तसेच महापारेषण कंपनीने आकस्मिक राखीव निधीच्या व्याजाच्या उपन्नाचा अंदाज करताना विविध वर्षातील आकस्मिक राखीवच्या पूर्व अनुमानीत शिलकीसाठी सरासरी ८ टक्के व्याज दर विचारात घेतला आहे.

महापारेषण कंपनीने वित्तीय वर्ष २०१२-१३ मधील "इतर/संकीर्ण प्राप्ती" ही वित्तीय वर्ष २०११-१२ मधील प्राप्तीच्या समान राहील असे गृहीत धरले आहे (यामध्ये P&I कडे स्थानांतरीत केलेल्या मागील वर्षातील परत न करावयाच्या अनामतीची रू. ४८ कोटी समाविष्ट केलेली नाही) तसेच महापारेषणने भंगार साहित्य, विक्री मूल्य, त्यातील नफा समाविष्ट करून ते दराव्यतिरिक्त उत्पनाचा एक भाग आहे अशा प्रकारे विचारात घेतलेले आहे.

खुल्या प्रवेशाच्या आकाराचा महसूल, या विषयी महापारेषण सादर करते की, वित्तीय वर्ष २०११-१२ साठी प्रत्यक्ष मिळालेला महसूल रू.१०९.५६ कोटी आहे. वित्तीय वर्ष २०१२-१३ मध्ये ते कमी होईल. कारण अल्प मुदतीच्या तत्वावर वितरण अनुज्ञाप्ती धारकांना, वीज मिळविण्यासाठी खुल्या प्रवेशाचे आकार लावण्यासाठीच्या पध्दतीत वदल झाले आहेत.

१.४.१.११ : **वित्तीय वर्ष २०१२-१३ मधील वार्षिक महसूलाची गरज**

तक्ता क्र.४ : **वार्षिक महसूल गरजेचा अंदाज**

(रू.कोटीमध्ये)

| अ. क्र. | तपशील | वित्तीय वर्ष २०१२-१३ | |
|---|---|---|---|
| | | बी.पी.आदेश | अंदाज |
| १. | संचलन व सुव्यवस्था खर्च | १११५.४२ | १११५.४२ |
| २. | घसारा खर्च | | |
| अ | घसारा | ५०१.५० | ५६०.४९ |
| व | घसा-याचा अग्रीम | १५५.६५ | ४१८.३३ |
| ३ | दिर्घ मुदतीच्या भांडवलाचे व्याज | ४६४.४१ | ५०४.५२ |
| ४ | खेळते भांडवल व ग्राहक सुरक्षा अनामतीवर व्याज | ७१.१० | ८०.३४ |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | इतर व्याज व वित्तीय आकार | १८.५० | १८.५० |
| ६ | इतर खर्च | १.२३ | १.१२ |
| ७ | आयकर | १५७.३४ | २७५.४० |
| ८ | आकस्मिक राखीवसाठी अंशदान | ४०.११ | ४०.२० |
| ९ | **एकूण महसूल खर्च** | **२५२५.२६** | **३०१४.३२** |
| १० | समभाग भांडवलावर परतावा | ६२९.०४ | ६४१.३८ |
| ११ | **एकूण महसूल गरज** | **३१५४.३०** | **३६५५.७०** |
| १२ | *वजा*ः दराव्यतिरिक्त उत्पन्न | १७८.१५ | २३२.६० |
| १३ | *वजा*ः गोवा व दादरा-नगर हवेली यांचेकडून व्हिलींग चार्जेसचे उत्पन्न | २०.५२ | २६.३० |
| १४ | **पारेषण दरापासुन एकूण महसूलाची गरज** | **२९५५.६३** | **३३९६.८०** |

१.४.१.१२ : **वित्तीय वर्ष २०१२-१३ साठी महसूलातील तफावत (Revenue Gap)**

वरील वावींचा आधारे वित्तीय वर्ष २०१२-१३ साठी हंगामी महासूलातील तफावत आणि वित्तीय वर्ष २०१२-१३ पर्यंतची संचित महसूल तफावत याची गणना करण्यात आली असून तिचा सारांश खालील तक्त्यात दिलेला आहे.

तक्ता क्र.५ : **संचित महसूल तफावत**

(रू. कोटीमध्ये)

| तपशील | वित्तीय वर्ष २०१२-१३ |
|---|---|
| नक्त एकूण महसूलाची गरज (ARR) | ३३९६.८० |
| विद्यमान पारेषण दरापासूनचे उत्पन्न | ३३३८.०४ |
| महसूलातील (तफावत)/अधिक्य - चालू वर्षासाठी | (५८.७६) |
| भरून न निघालेली संचित महसूल (तफावत) | (५८.७६) |

यानुसार रू.५८.७६ कोटी एवढी तफावत वित्तीय वर्ष २०१३-१४ च्या वार्षिक महसूलाच्या गरजेत समाविष्ट केली आहे आणि मा. आयोगाला महापारेषण कंपनीची विनंती आहे की, त्यांनी ती वित्तीय वर्ष २०१३-१४ वार्षिक महसूल गरजेला मंजुरी द्यावी.

## १.५ : वित्तीय वर्ष २०१३-१४ ते वित्तीय वर्ष २०१५-१६ या कालावधीची एकूण महसूल गरज, महसूलातील तफावत आणि पारेषण दरावरचा परिणाम

### १.५.१ : एकूण महसूल गरज

#### १.५.१.१ : संचालन व सुव्यवस्था खर्च

महापारेषण कंपनीने या विनंती अर्जात संचालन व देखभाल खर्च मा.आयोगाच्या बहुवार्षिक दर निर्धारण नियमावली-२०११ नुसार वेज (Bays) आणि तारांच्या लांवी (Circuit Kilomaters) वरून गृहीत धरले आहे. पारेषण जाळीची वेज (Bays) आणि तारांच्या लांवी (Circuit Kilomaters) यांची संख्या व्यावसायिक आराखडयातील योजीत संख्येपेक्षा वेगळी आहे. कारण विनंती अर्जात ऊर्जा रोहित्र (Power Transformer) आणि केंद्र रोहित्र वेज (Station Transformer bays) गृहीत धरले आहे जे व्यावसायिक आराखडयात गृहीत धरले नव्हते. वित्तीय वर्ष २०१०-११, वित्तीय वर्ष २०११-१२ आणि वित्तीय वर्ष २०१२-१३ साठी दिलेल्या या विनंती अर्जात पारेषण

जाळीच्या बेज ची संख्या (No. of bays) आणि तारांच्या लांबीची (Circuit Kilomaters) संख्या त्या प्रत्येक वर्षात संपादित केली आहे.

१.५.१.२ ः **भांडवलीकरण**

सध्याचा बहुवार्षिक दर विनंती अर्जाच्या हेतुसाठी महापारेषण कंपनीने नियंत्रण कालावधीसाठी भांडवलीकरणाची रक्कम ही मा. आयोगाने महापारेषणच्या व्यवसाय आराखडयाच्या प्रकरण क्र.१३७ वर्ष २०११, यात मंजूर केलेल्या रक्कमे इतकीच विचारात घेतली आहे.

याशिवाय येथे सादर करण्यात येते की, व्यवसाय आराखडयात सादर केलेली भांडवली खर्चा ची योजना ही राज्य पारेषण संस्थेने (STU) दिलेल्या निवेष्टीवर आधारित आहे व तिचे सादरीकरण स्थायी समितीपुढे (Standing Committee) पुढे केले होते व त्याची नोंदणी, प्रकरण क्र.१३७ वर्ष २०११ या व्यवसाय आराखडयाच्या आदेशात झाली होती; ती खाली उदधृत करण्यात येत आहे.

"२.४.७ महापारेषण कंपनीने सादर केले की, भांडवली खर्चासाठी प्रस्तावित केलेली भांडवली खर्चाची (Capex) योजना ही राज्य पारेषण संस्था (STU) यांच्याकडुन मिळालेल्या निविष्टीवर (Inputs) आधारित आहे. सदर STU यांनी ही योजना संपूर्ण राज्यासाठी केली होती त्यात राज्यात कार्यचालन करणा-या प्रत्येक पारेषण परवानाधारकाकडून हाती घेण्यात येणा-या योजनांची स्पष्ट ओळख देण्यात आली होती; त्यात महापारेषणचाही समावेश होता. याशिवाय महापारेषण सादर करते की, मा.आयोग यांनी त्यांचे प्रत्र दि. १९ जुलै २०१२ यात दिलेल्या आदेशाप्रमाणे व्यवसाय आराखडा (Business Plan) स्थायी समितीला सादर करण्याचा आदेश दिला होता, त्यानुसार भांडवली खर्चाची योजना, स्थायी समितीच्या ९ व्या बैठकीत सादर करण्यात आला. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी मा.संचालक (प्रवर्तन / संचालन) महापारेषण हे होते आणि या बैठकीत राज्य पारेषण संस्था, महापारेषण, आर.इन्फा.टी, टी.पी.सी.टी आणि पी.जी.सी.आय.एल यांचे प्रतिनिधी उपस्थित होते."

याशिवाय येथे सादर करण्यात येते की, एस.टी.यू. च्या योजनेचे बारकाईने व नियमितपणे निरिक्षण करण्यात येते जेणेकरून केलेली योजना व प्रत्यक्ष होत असलेली अंमलबजावणी यातील फरक किमान असेल. महाराष्ट्र राज्यातील पारेषणचे जाळे (Network) यावर लक्ष ठेवणा-या विविध संस्था खालीलप्रमाणे आहे.

अ) एस.टी.यू. सुकाणू समिती

ब) मा.आयोगाने रचना केलेली स्थायी समिती (Standing Committee)

क) प्रकल्प निरिक्षण समिती याचे अध्यक्ष मुख्य अभियंता करार कंत्राट व निरिक्षण असतात. अशा प्रकल्पांवर दैनंदिन तत्त्वावर लक्ष ठेवले जाते.

ड) ग्रीड को ऑर्डीनेशन कमिटी वीजजाळे समन्वय समिती महत्त्वाच्या प्रकल्पांचा आढावा घेते.

ई) पश्चिम प्रदेश वीज समिती ही प्रादेशिक स्तरावर लक्ष ठेवते तसेच संपूर्ण पश्चिम प्रदेशातील वीजजाळयाच्या विकासावर लक्ष ठेवते. यात STU व CTU चा समाविष्ट आहे.

१.५.१.३ ः **व्याज व वित्तीय आकार**

महापारेषण कंपनीने आपल्या भांडवली खर्चाच्या निधीसाठी, प्रथम पुढील वित्तीय संस्थांच्या विद्यमान कर्ज-करारांचा विचार केला आहे. या संस्था म्हणजे एल.आय.सी., जी.आय.सी.ए.,

आय.एफ.सी., बँक ऑफ महाराष्ट्र आणि ओरिएंटल बँक ऑफ कॉमर्स आहे. त्यानंतर आपल्या ऋणाच्या आवश्यकतेसाठी ऋण व समभाग यांचे गुणोत्तर ८० : २० असे ठेवण्यासाठी आर.इ.सी. व पी.एफ.सी. यांचेकडून कर्जे घ्यावीत असा महापारेषण कंपनीचा मानस आहे. जरी महापारेषण कंपनीने आपल्या विनंती अर्जात नियंत्रण कालावधीतील निवृत्त मत्तांच्या ८० टक्के कपातीचा अंदाज केला असला तरी मा.आयोगास महापारेषण कंपनीची नम्र विनंती आहे की, त्यांनी निवृत्त मत्तांच्या ८० टक्के कर्जाची रक्कम कमी करू नये आणि त्यानुसार मुख्य विनंती अर्जात समर्थनासह सादर केलेला व्याज खर्च कमी करू नये. वित्तीय वर्ष २०१३-१४ ते वित्तीय वर्ष २०१५-१६ याचे इतर व्याज व वित्त आकार हे मा.आयोगाने व्यवसाय आराखडया संबंधीचे प्रकरण क्र.१३७, वर्ष २०११ च्या आदेशात मंजूर केल्या इतकेच हिशेवात धरलेले आहेत.

१.५.१.४ : घसारा

महापारेषण कंपनीने दुस-या नियंत्रण कालावधीसाठी घसा-याचा हिशेव म.वी.नियामक आयोग (वहुवार्षिक दर) नियमन २०११ यात दिलेला घसारा दर विचारात घेऊन केलेला आहे. महापारेषण कंपनीची मा. आयोगास प्रार्थना आहे की, त्यांनी सदर वर्षातील दावा केलेल्या परतफेडीच्या रकमेपुरती मंजुरी मर्यादित करू नये. तर महापारेषण कंपनीने सदर वर्षी घसा-यासाठीचा अग्रीम (ARR) याचा दावा केलेल्या प्रत्यक्ष परतफेडीच्या जादा रकमेची मागणी करण्यास महापारेषण कंपनीला परवानगी द्यावी.

१.५.१.५ : खेळते भांडवल व ग्राहक सुरक्षा अनामत यावरील व्याज

महापारेषण कंपनीने आवश्यक खेळत्या भांडवलाच्या व्याजाचा हिशेव म.वी.नियामक आयोग (वहुवार्षिक दर) नियम २०११ यात विहीत केलेल्या प्रमाणक मापदंड (normative Paramaters) यांच्या आधारे केलेला आहे. महापारेषण कंपनीने चालू वर्षातील अल्प मुदतीच्या एस.वी.आय.पी.एल.आर. १४.७५ टक्के ऐवजी महापारेषणच्या व्यवसाय आराखडयासंवंधीचा प्रकरण क्र.१३७, वर्ष २०११ च्या आदेशात विचारात घेतलेल्या १४.४५ टक्के असा विचारात घेतला आहे.

१.५.१.६ : समभागावरील परतावा (ROE)

महापारेषण कंपनीने वहुवार्षिक दर नियंत्रण कालावधीसाठीचा समभागावरील परताव्याचा प्रक्षेप म.वी.नियामक आयोग (वहुवार्षिक दर) नियमन २०११ च्या आधारे केलेला आहे. तसेच महापारेषण कंपनीने नियंत्रण कालावधीतील निवृत्त होणारे मत्तामुळे समभाग परतावा वरील घटाचा अंदाज, व्यवसाय आराखडा आदेश, प्रकरण क्र.१३७, वर्ष २०११ मध्ये विहीत केलेल्या पध्दतीनुसार केला आहे.

१.५.१.७ : इतर खर्च

महापारेषण कंपनीने इतर खर्चाचा अंदाज वित्तीय वर्ष २०११-१२ यात झालेल्या प्रत्यक्ष खर्चात फक्त २ टक्के नाममात्र वाढ होईल अशा विचाराने केला आहे. त्यात पूर्व काळातील समायोजना (adjustment) व हानी समाविष्ट केलेली नाहीत.

१.५.१.८ : आकस्मिक राखीव साठी अंशदान

महापारेषण कंपनीने आकस्मिक राखीवतेचा हिशेव, मा.आयोगाने प्रकरण क्र.१३७, वर्ष २०११ च्या महापारेषण कंपनीच्या व्यवसाय आराखडयाच्या मंजुरीच्या आदेशात त्याला मंजुरी देताना अंगीकारलेल्या पध्दतीनुसार आरंभीच्या जी.एफ.ए.च्या ०.२५ टक्के याप्रमाणे केला आहे.

१.५.१.९ : वित्तीय वर्ष २०१३-१४ ते वित्तीय वर्ष २०१५-१६ चा आयकर

म.वि.नि.आयोग बहुवर्षीय दर नियम, २०११ च्या अधिनियम ३४.१ अंतर्गत वित्तीय वर्ष २०११ १२ साठी भरलेल्या आयकराच्या रकमेवरून, दुस-या नियंत्रण कालावधीसाठी आयकराची रक्कम रू. १७९.६७ विचारात घ्यावी अशी विनंती महापारेषण कंपनी मा.आयोगास करते.

### १.५.१.१० : दराव्यतिरिक्त उत्पन्न

महापारेषणने दराव्यतिरिक्त उत्पन्नाच्या घटकात वित्तीय वर्ष २०११-१२ च्या प्रत्यक्ष मूल्यांच्या आधारे ( व्याजाचे उत्पन्नाशिवाय अन्य उत्पन्न) यात नाममात्र २ टक्के वाढ विचारात घेतली आहे. महापारेषण कंपनीने विविध वर्षातील आकस्मिक व विशेष निधी यांच्या अंदाजित राखीव यावरील सरासरी ८ टक्के या व्याजदराने (शासकीय प्रतिकृती) आकस्मिक राखीवच्या व्याज उत्पन्नात वाढ केली आहे.

महापारेषण कंपनीने वित्तीय वर्ष २०१२-१३ साठी इतर/संकीर्ण प्राप्ती यांची रक्कम वित्तीय वर्ष २०११-१२ च्या रकमे इतकीच घेतलेली आहे. (यातून नफा व तोटा स्थानांतरीत केलेली मागील काही वर्षातील परत न करावयाच्या अनामतीची रू.४८ कोटीची रक्कम वगळली आहे) आणि त्यात प्रती वर्षी २ टक्के या दराने वाढ केली आहे. महापारेषण कंपनीने भंगाराचे मूल्यात भंगार विक्रीतील नफा समाविष्ट केला असून त्याचा विचार 'दरा व्यतिरिक्त उत्पन्नात' केला आहे.

खुल्या प्रवेशाच्या आकारापासून मिळणा-या महसूलाबावत महापारेषण कंपनी सादर करते की, वित्तीय वर्ष २०११-१२ मधील प्रत्यक्ष महसूल रू.१०९.५६ कोटी असला तरी वित्तीय वर्ष २०१२-१३ पासून ही रक्कम कमी होईल, कारण अल्प मुदत तत्वावर वीज मिळविण्या-या वितरण परवानाधारक संस्थांकडून वसूल करावयाच्या खुल्या प्रवेश आकाराच्या पध्दतीत बदल करण्यात आला आहे.

### १.५.१.११ : नियंत्रण कालावधीसाठी एकूण महसूलाच्या गरजेचा प्रक्षेप

वरील चर्चेच्या/स्पष्टीकरणाच्या आधारे बहुवार्षिक दराच्या दुस-या नियंत्रण कालावधीतील एकूण महसूलाच्या गरजेचा प्रक्षेप खालील तक्त्यानुसार आहे.

तक्ता क्र.६ **एकूण महसूल गरजेचा प्रक्षेप**

(रू.कोटीमध्ये)

| तपशील | वित्तीय वर्ष २०१३-१४ | | वित्तीय वर्ष २०१४-१५ | | वित्तीय वर्ष २०१५-१६ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | व्यवसाय आराखडा आदेश | बहुवार्षिक दर विनंती अर्ज | व्यवसाय आराखडा आदेश | बहुवार्षिक दर विनंती अर्ज | व्यवसाय आराखडा आदेश | बहुवार्षिक दर विनंती अर्ज |
| संचलन व सुव्यवस्था खर्च | १३२९.८१ | १४०१.२४ | १५१६.५२ | १६३३.२१ | १७५७.३२ | १८७८.६५ |
| घसारा | ११०१.४६ | ११०२.७५ | १२८३.०८ | १२८५.२५ | १४५६.७२ | १४५५.८७ |
| घसा-याचा अग्रीम | — | ३२.४१ | — | ०.०० | — | ११५.५७ |
| दिर्घ मुदतीच्या कर्ज भांडवलावर व्याज | ९९१.१२ | ७५२.३९ | ११८५.७० | १०१७.४९ | १३४३.५५ | १२२६.१७ |
| खेळते भांडवल व ग्राहक सुरक्षा अनामतीवर व्याज | ९७.६० | ९४.१९ | ११२.९८ | १११.३५ | १२९.०९ | १३०.२६ |
| इतर व्याज व वित्तीय आकार | १६.९१ | १६.९१ | १९.२१ | १९.२१ | १६.२२ | १६.२२ |
| इतर खर्च | १.२१ | १.१४ | १.२३ | १.१७ | १.२६ | १.१९ |
| आयकर | १०३.६७ | १७९.६७ | १०३.६७ | १७९.६७ | १०३.६७ | १७९.६७ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| आकस्मिक राखीवसाठी अंशदान | ४९.२४ | ४९.२४ | ५७.२९ | ५७.२९ | ६६.५८ | ६६.५९ |
| **एकूण महसूल खर्च** | **३६९१.०१** | **३६२९.९५** | **४२७९.६९** | **४३०४.६५** | **४८७४.४२** | **५०७०.११** |
| समभाग भांडवलावर परतावा | ८०२.९६ | ८१६.६३ | ९१०.५१ | ९२४.१७ | १०१२.७१ | १०२६.३७ |
| **एकूण महसूल गरज** | **४४९३.९७** | **४४४६.५७** | **५१९०.२०** | **५२२८.८२** | **५८८७.१३** | **६०९६.५६** |
| <u>वजा</u>ः दराव्यतिरिक्त उत्पन्न | १९७.९४ | २४०.३९ | २०५.७० | २४८.९४ | २१४.२२ | २५८.२८ |
| <u>वजा</u>ः गोवा व दादरा-नगर हवेली यांचेकडून व्हिलींग चार्जेसचे उत्पन्न | २०.५२ | २६.३० | २०.५२ | २६.३० | २०.५२ | २६.३० |
| <u>वजा</u>ः मालाच्या पूनर्मूल्यांकनामुळे कर्जफेडीच्या तरतुदीचे उत्पन्न | — | ३०.५० | — | ३०.५० | — | ३०.५० |
| **पारेषण दरासाठी एकूण महसूलाची गरज** | ४२७५.५१ | ४१४९.३९ | ४९६३.९८ | ४९२३.०८ | ५६५२.३९ | ५७८१.४८ |

महापारेषण कंपनी मा. आयोगास नम्र विनंती करते की, त्यांनी वहुवार्षिक दर कालावधी वित्तीय वर्ष २०१३-१४ ते वित्तीय वर्ष २०१५-१६ यासाठी उपरिनिर्दिष्ट एकूण महसूल गरजेस मंजुरी द्यावी.

१.५.१.१२ ः <u>नियंत्रण कालावधीतील महसूलातील अंतर (Gap)</u>

नियंत्रण कालावधीतील प्रत्येक वर्षासाठी प्रस्तावित महसुलातील तफावतीमध्ये आंतरराज्यीय वहुवार्षिक दरसुची आदेश प्र.क्र.५६ वर्ष २०१३ दिनांक १३ मे २०१३ म्हणजे "नियंत्रण कालावधीसाठी वित्तीय वर्ष २०१३-१४ ते वित्तीय वर्ष २०१५-१६ साठी निर्धारीत केलेला आंतरराज्यीय पारेषण आकार" गृहीत धरला आहे,. उपरिनिर्दिष्ट वावींच्या आधारे नियंत्रण कालावधीसाठी प्रक्षेपित महसूलातील अंतराचा विचार (हिशेव) करण्यात आला असून तो खालील तक्ता क्र.७ मध्ये सारांश रूपाने दर्शविला आहे.

**तक्ता क्र. ७ <u>संचित महसुलातील अंतर</u>**

(रू. कोटीमध्ये)

| तपशील | वित्तीय वर्ष २०१३-१४ | वित्तीय वर्ष २०१४-१५ | वित्तीय वर्ष २०१५-१६ |
|---|---|---|---|
| नक्त एकूण महसूल गरज (Net ARR) | ४१४९.३९ | ४९२३.०८ | ५७८१.४८ |
| दिनांक १३ मे २०१३ च्या आंतरराज्यीय पारेषण प्रणाली दरसूची आदेशानुसार पारेषण आकारापासून उत्पन्न | ४२७५.५१ | ४९६३.९८ | ५६५२.३९ |
| वर्षातील एकल अंतर (हंगामी) | १२६.१२ | ४०.९० | (१२९.०९) |
| वसूल न झालेला महसूल (अंतर)/अधिक्य वर्ष २०११-१२ साठी | (१२४९.८८) | — | — |
| वसूल न झालेला महसूल (अंतर)/अधिक्य वर्ष २०१२-१३ साठी | (५८.७६) | — | — |

| | | | |
|---|---|---|---|
| मागील काळातील नामंजूर केलेल्या भांडवलीकरणाचा आघात | (१४५.१६) | — | — |
| दिनांक १३ मे २०१३ च्या आंतरराज्यीय पारेषण प्रणाली दरसूची आदेशामध्ये मंजुरीनुसार मागील वर्षातील वसूल करण्यात आलेल्या पारेषण आकारापासुन उत्पन्न | ८७६.७२ | ०.०० | ०.०० |
| वर्षापर्यंत संचित वसूल न झालेले अंतर | (४५०.९५) | ४०.९० | (१२९.०९) |

महापारेषण कंपनी मा.आयोगास नम्रपणे विनंती करते की, कृपया प्रत्येक वर्षातील एकूण महसूलाच्या गरजेत वर नमूद केलेल्या महसूलातील अंतराच्या (Revenue Gap) रकमा समाविष्ट करण्यात याव्यात आणि एक पारेषण दर द्यावा, म्हणजे त्यामुळे हे अंतर वसूल करण्यास मदत होईल.

याशिवाय, मा.आयोगाने आपल्या व्यवसाय आराखडा संबंधीच्या प्रकरण क्र.१३७, वर्ष २०११ च्या आदेशात महापारेषण कंपनीला आदेश दिला होता की, बहुवार्षिक दराच्या विनंती अर्जात, प्रस्तावित एकूण महसूलाच्या गरजेच्या आधारे, मागील काळातील महसूलातील अंतर/अधिक्य समाविष्ट करून, त्याचा पारेषण दरावरील प्रती युनिट आघात (per unit Impact) सादर करावा.

मा.आयोगाच्या व्यवसाय आराखडा आदेश क्र.१३७, वर्ष २०११ यात दिलेल्या आदेशाची पूर्तता करण्यात आली आहे. महापारेषण कंपनीने प्रस्तावित एकूण महसूल गरजेचा पारेषण दरावरचा आघात खालील तक्ता क्र.८ मध्ये सारांश रूपाने दिला आहे.

सध्याच्या बहुवार्षिक योजनेमधील एकत्रित महसूल गरज आणि प्रकरण क्र.५६, वर्ष २०१३ दिनांक १३ मे २०१३ मधील आंतरराष्ट्रीय पारेषण प्रणाली दरसूची आदेशानुसार आयोगाने केलेली मागणी यांना विचारात घेउन खालील तक्ता बनवला आहे.

तक्ता.क.८ : एकुण महसुल गरजेचा आघात

| अ.क्र. | तपशील | मापनाचे एकक | आर्थिक वर्ष २०११-१२ * | आर्थिक वर्ष २०१२-१३# | आर्थिक वर्ष २०१३-१४$ | आर्थिक वर्ष २०१४-१५$ | आर्थिक वर्ष २०१५-१६ $ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | बहुवार्षिक व्यवसाय योजनेनुसार महापारेषण कंपनीने केलेली एकत्रित महसूल गरज मागणी | रू.कोटीमध्ये | २२६४.२५ | ३५५२.८० | ५६०३.१८ | ४९२३.०८ | ५७८१.४८ |
| २ | आंतरराष्ट्रीय पारेषण प्रणाली दरसूची आदेशानुसार सरासरी प्रासंगी आणि प्रासंगी नसलेली अधिकतम मागणी $ | एमडब्ल्यु | १३४२९.०० | १५६३४.०० | १७७४८.०० | १९५३३.०० | २११०२.०० |
| ३ | सध्याच्या बहुवार्षिक व्यवसाय योजनमधील केलेल्या एकत्रित महसूल गरजेनुसार महापारेषण कंपनीचे आंतरराष्ट्रीय पारेपण प्रणाली दरसूचीमध्ये अंशदान @ | रू./कि.वॅ./महिना | १४०.५१ | १८९.३७ | २६३.०९ | २१०.०३ | २२८.३२ |
| ४ | | रू.प्रति कि.वॅ | ०.१९ | ०.२५ | ०.३५ | ०.२८ | ०.३१ |
| ५ | आंतरराष्ट्रीय पारेषण प्रणाली दरसूची आदेशानुसार महाराष्ट्रातील पारेषण आकार | रू./कि.वॅ./महिना | १६४.६८ | २१३.३९ | ३२०.२२ | २६५.२५ | २८५.१३ |
| ६ | | रू.प्रति कि.वॅ | ०.२२ | ०.२९ | ०.४३ | ०.३६ | ०.३८ |

* प्रकरण क्र.१२०, वर्ष २००९ साठी दिनांक १० सप्टेंबर २०१० चा आदेश आहे. वित्तीय वर्ष २०११-१२ साठी वेगळया पारेषण दराचा आदेश नाही. राज्यासाठी मंजूर झालेला पारेपण दर रू.०.२२ प्रति कि.वॅ.आणि रू.१६४.६८ प्रति कि.वॅ.प्रति महिना असा आहे.

# प्रकरण क्र.५१, वर्ष २०१२ साठी दिनांक २१ मे २०१२ चा आदेश आहे.

$ वित्तीय वर्ष २०१३-१४ ते वित्तीय वर्ष २०१५-१६ साठीचे एकूण महसूली गरज सध्याच्या बहुवार्षिक व्यवसाय योजनवर आधारित आहे याची नोंद घ्यावी

वित्तीय वर्ष २०१३-१४ ते वित्तीय वर्ष २०१५-१६ साठीचे पारेपण आकार आणि मागणी प्रक्षेपण आयोगाच्या आंतरराष्ट्रीय पारेषण प्रणाली दरसूची आदेशामधील प्रकरण क्र.५६, वर्ष २०१३दिनांक १३ मे २०१३ वर आधारित आहे.

@ महापारेपण कंपनीचे आंतरराष्ट्रीय पारेपण प्रणाली आकारामधील अंशदान आंतरराष्ट्रीय पारेपण प्रणाली आदेशामध्ये वेगळी मान्य केलेली नाही आणि सध्याच्या बहुवार्षिक योजनेमधील एकत्रित महसूल गरज आणि प्रकरण क्र.५६, वर्ष २०१३ दिनांक १३ मे २०१३ मधील आंतरराष्ट्रीय पारेपण प्रणाली दरसूची आदेशानुसार आयोगाने केलेल्या मागणी प्रक्षेपण नुसार फक्त चित्रांकनासाठी गृहीत धरले आहे.

*प्रार्थना*ः—

मा. आयोगास महापारेषण कंपनी प्रार्थना करते की,

१. त्यांनी हा बहुवार्षिक दराचा विनंती अर्ज दाखल करावा.

२. त्यांनी मागील वर्षात नामंजूर केलेल्या भांडवलीकरणाच्या आघाताची योग्य त्या चालू (carrying) खर्चासह वसुली करण्यास परवानगी द्यावी व वित्तीय वर्ष २०१३-१४ च्या एकूण महसूलाच्या गरजेसह त्यांची वसुली करण्यास परवानगी द्यावी.

३. मा. आयोगाने त्यांचे म. वी. नियामक आयोग (दराच्या अटी व शर्ती) नियमन २००५ यातील तत्वानुसार, लेखापरिक्षित लेख्यानुसार वित्तीय वर्ष २०११-१२ चे सत्यानुरूप खर्च (True up Expenses) मंजूर करावेत, तसेच महापारेषण प्रणालीच्या वापरकर्त्यांसोबत कार्यक्षमतेच्या लाभाची योग्य प्रमाणात वाटणी केल्यानंतर वाढलेल्या महसूलातील अंतर (Gap)/अधिक्य यांना मंजुरी द्यावी.

४. या विनंती अर्जातील सादर केल्यानुसार व प्रमाणानुसार महापारेषण कंपनीने मागणी केलेल्या मर्यादित, वित्तीय वर्ष २०१२-१३ चे हंगामी सत्यानुरूप माहिती मंजूर करावी.

५. या विनंती अर्जातील दिलेले वित्तीय वर्ष २०१३-१४ ते वित्तीय वर्ष २०१५-१६ ची एकूण महसूल गरजेचे अंदाज मंजूर करावेत.

६. वित्तीय वर्ष २०१३-१४ ते वित्तीय वर्ष २०१५-१६ चे दर अशा प्रकारे निश्चित करावेत की, जेणेकरून नियंत्रण कालावधीतील प्रत्येक वर्षातील महसूलातील अंतर/अधिक्य यांचा समावेश करून, एकत्र केलेल्या एकूण महसूलाच्या गरजेची वसुली करण्यास मदत होईल.

७. म. वी. नियामक आयोग बहुवार्षिक नियमन २०११ मधील विहीत मापदंडापासून काहीसे विचलन (Deviation) करण्याचा प्रयत्न या विनंती अर्जात करण्यात आला आहे, त्यास मा. आयोगाने मंजुरी द्यावी अशी प्रार्थना आहे.

८. महापारेषण कंपनीचे वर दिलेले सत्यानुरूपकरण आणि एकूण महसूलाची गरज यास मंजुरी देण्यासाठी मा. आयोगातर्फे वापरले जाणारे, कार्यास योग्य होणारे एकसेल मॉडेल उपलब्ध करून देण्याची विनंती आहे.

९. या अर्जात काही उणिवा/त्रुटी आढळल्यास त्या कृपया माफ कराव्यात आणि आवश्यक अशी जादा माहिती/आकडेवारी इ. नंतर सादर करण्याची महापारेषण कंपनीला परवानगी द्यावी.

मुंबईः
दिनांकः १२.०७.२०१३

(प्रताप गणपतराव मोहिते)
संचालक (वित्त)
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित
(महापारेषण)